आदेश पत्र क्र. प्रस्तुतकार/जिल्हाधिकारी/कावि-161 /2016

मौजा – **बेलतरोडी**, प.ह.नं – 12 **अ**, तहसिल – **नागपूर (ग्रामिण)**

रा.मा.क्र. 161/एन.ए.पी. - 34/2015 - 2016

जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय, नागपूर

दिनांक 12/02/2016

वाचले : 1. **श्रीमती सुशिला चंद्रकांत वाघमारे**, राहणार – 401, **रॉयल विस्टा अपार्टमेंट, धंतोली, नागपूर,**

2. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 चे कलम 44(1) आणि कलम 123 सह.

3. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचे पत्र क्रमांक : **का. अभि. (मेट्रो)/स.अ.-1/3748**, दिनांक 04/12/2015

## आदेश

**श्रीमती सुशिला चंद्रकांत वाघमारे**, राहणार – 401, **रॉयल विस्टा अपार्टमेंट, धंतोली, नागपूर**, यांनी, मौजा – **बेलतरोडी**, प.ह.नं.– 12 **अ**, तालुका - **नागपूर (ग्रामिण)**, सर्व्हे क्रमांक – **34/2**, आराजी – 0.81 **हे. आर.**, म्हणजेच 8100.00 चौरस मिटर पैकी आराजी – 0.30 **हे. आर.**, म्हणजेच 3000.00 चौरस मिटर ला **निवासी** वापरास अकृषिक परवानगी मिळण्याबाबत अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने संबंधित विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मागविण्यात आले व जाहिरनामा काढण्यात आला. कोणाचेही आक्षेप विहित कालावधीत प्राप्त झालेले नाहीत.

**प्रकरणांत खाली नमुद विभागांचे नाहरकत प्रमाणपत्र मुदतीत प्राप्त झालेले आहेत.**

1. अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागरी जमिन कमाल धारणा, नागपूर
2. कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
3. कार्यकारी अभियंता, अ.ऊ.दा. बांधकाम विभाग-1, म.रा.वि.पा.कं.मर्या., नागपूर

4. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नागपूर
5. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक 2, नागपूर
6. उपविभागीय अधिकारी, **नागपूर (ग्रामिण)**
7. उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), नागपूर
8. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नागपूर
9. तहसिलदार, **नागपूर (ग्रामिण)**
6. ग्राम पंचायत **बेसा-बेलतरोडी**

अर्जदाराने गांव नमुना 7/12, तलाठी नकाशा, अधिकार अभिलेख पंजी, गांव नमुना 8-अ, मोजणी नकाशा व अभिन्यास सादर केलेला आहे. उपरोक्त सर्व विभागांनी **निवासी** वापरास अकृषिक देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील अधिनियम क्रमांक 41 चे कलम 2 मध्ये शासन अध्यादेशानुसार सुधारणा करण्यात आली असुन संहितेच्या कलम 42 नंतर 42 **अ चा समावेश करण्यात आलेला आहे**. उक्त 42 अ मधील दुरुस्तीनुसार विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नसणे याचा अंतर्भाव करण्यात आला आहे, नियोजन प्राधिकरणाने सदर्हु क्षेत्र हे मंजुर **प्रादेशिक योजना, नागपूर** नुसार **"दक्षिण प्रभाग क्षेत्रात समाविष्ट असुन एम-8 नुसार "निवासी" उपयोगाने प्रस्तावित आहे, तसेच नागपूर महानगर क्षेत्राकरीता प्रसिध्द प्रारुप विकास योजनेत "निवासी-2" उपयोगाने प्रसतावित असल्याने, निवासी वापर अनुज्ञेय आहे" अभिन्यास नकाशास अंतिम मंजुरीची शिफारस सादर केली आहे.**

शासन अध्यादेश दिनांक 22 डिसेंबर 2014 मधील 7 – अ नुसार **जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा व तीवरील भार याबाबत विनिश्चिती करण्यात आली आहे.**

अर्जदारास विषयांकीत प्रकरणी **निवासी** वापरास अकृषिक परवानगी मंजूर करावयाची असल्यामुळे अकृषिक सारा आकारावयाचे क्षेत्र **2592.4409** चौ.मी. (2292.1479+300.293)

चौ.मी. (निवासी + ॲमेनीटी) ला अकृषक सारा रुपये 0.05 **न.पै. (निवासी),** प्रति चौ.मी. प्रमाणे **₹=130/-**, ग्रामपंचायत सेस अकृषिक साऱ्या एवढा **₹=130/-**, जिल्हा परिषद सेस अकृषिक साऱ्यावर ₹=7.00 प्रमाणे **₹=910/-**, परावर्तीत सारा अकृषिक साऱ्याचे 5 पट **₹=650/-**, असे एकुण रक्कम ₹=1820/- अर्जदाराने 04/02/2016 रोजी चलान क्रमांक **GRN MH00 6972134 201516M** अन्वये खजिना दाखल केली आहे.

वरील बाबी विचारात घेता **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,** 1966 व त्याखालील **नियम** 1969 या अंतर्गत तरतुदीस अधिन राहुन **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,** 1966 चे कलम 44 अन्वये असलेल्या अधिकारास अनुसरुन मी **जिल्हाधिकारी, नागपूर** खालील अटी व शर्तीस अधिन राहुन **श्रीमती सुशिला चंद्रकांत वाघमारे,** राहणार – 401, **रॉयल विस्टा अपार्टमेंट, धंतोली,** नागपूर, यांना मौजा – **बेलतरोडी,** प.ह.नं. – 12 **अ,** तालुका - **नागपूर (ग्रामिण),** सर्व्हे क्रमांक - 34/2, आराजी – 0.81 **हे. आर.,** म्हणजेच 8100.00 चौरस मिटर पैकी आराजी – 0.30 **हे. आर.,** म्हणजेच 3000.00 चौरस मिटर जागेपैकी **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी मंजुर केलेले अभिन्यास क्षेत्र आराजी – 0.30 **हे. आर.,** म्हणजेच 3000.00 चौरस मिटर जमीनीस **निवासी** वापरास खालील विवरणानुसार अकृषिक परवानगी क्षेत्रास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

| **AREA CALCULATION** | |
|---|---|
| AREA OF LAND AS PER 7/12 | **8100.00 SQ.MT.** |
| AREA OF LAND UNDER CONVERSION | **3000.00 SQ.MT.** |
| MINIMUM AREA OF LAND AS PER K PRAT | **3000.00 SQ.MT.** |
| AREA UNDER D.P. / R.P. PROPOSALS, IF ANY | **NIL** |
| GROSS AREA UNDER LAYOUT | **3000.00 SQ.MT.** |
| AREA UNDER OPEN SPACE | **400.955 SQ.MT.** |
| AREA UNDER AMENITY SPACE | **300.293 SQ.MT.** |
| AREA UNDER APPROACH & VEHICULAR ROAD | **0.00 SQ.MT.** |

| | |
|---|---|
| AREA UNDER SERVICE ROAD / ROAD WIDENING, AS PER CLAUSE 24.1 | **152.876 SQ.MT.** |
| AREA UNDER RESIDENTIAL PLOTS | **2145.876 SQ.MT.** |

**NA 1** – NET PLOT AREA FOR LAYOUT AT 90% OF AREA EXCLUDING AMENITY SPACE & D.P./R.P. PROPOSALS IF ANY, & AREA FOR ROAD WIDENING AND SERVICE ROAD AS PER CLAUSE 24.1 FROM GROSS AREA UNDER LAYOUT, AS PER CLAUSE 13.4.1 OF SDCPR

**= 90% [3000.00 – (152.876+300.293)] = 2292.1479 SQ.MT.**

**AF** – ADDITIONAL F.S.I. FOR AREA UNDER DP/RP ROADS + AREA FOR ROAD WIDENING AND SERVICE R OAD AS PER CLAUSE 24.1) = **152.876 SQ.MT.**

**NOTE** – ADDITIONAL F.S.I. 152.876 SQ.MT. + NET RESIDENTIAL PLOT AREA 2292.1479 SQ.MT. IS APPROVED.

ADDITIONAL FSI SHOWN ABOVE IS SUBJECT TO COMPLIANCE OF PROVISIONS OF NO. 24.1 OF SDCPR BY THE LAND OWNER.

1. ज्या प्रयोजनासाठी अकृषिक वापरास परवानगी दिलेली आहे त्या खेरीज जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय इतर वापर अनुज्ञेय नाही.
2. अनुग्राही यांनी निवासी वापरास सुरुवात केल्यापसुन **एक** महिन्याचे आंत तलाठी यांचेमार्फत तहसिलदार यांना वापर सुरु केल्याचा दिनांक कळविला पाहिजे.
3. अनुग्राही यांनी निवासी अकृषिक वापरास परवानगी मिळाल्याचे दिनांकापासुन दरसाल प्रचलित **0.05 न.पै. (निवासी),** प्रती चौ. मी. दराने आकारणी दरात वेळोवेळी अमंलात येणारा अकृषिक दर पुर्वलक्षी पध्दतीने जरी हमी कालावधी संपुष्टात आला नसला तरी लागु झाल्यास तो भरण्यास बंधनकारक राहील.

4. वरील अट क्रमांक 3 मध्ये नमुद केलेल्या अकृषिक आकारणीचा दर हा अंतरिम असुन शासनाच्या मंजुरी प्रमाणे पुर्वलक्षी पध्दतीने बदलण्यास पात्र राहील. या व्यतिरिक्त स्थानिक उपकर भरणेही बंधनकारक राहील.
5. आदेशातील कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास जिल्हाधिकारी, नागपूर दंडनिय कारवाई करु शकतील व अशा प्रकारे केलेला दंड हा जमीन महसुलाची थकबाकी समजुन वसुल करण्यात येईल.
6. अनुग्राही यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (जमीनीच्या वापरास बदल व अकृषिक आकारणी) नियम 1969 नुसार वर नमुद केलेल्या आदेशातील अटी / शर्ती मान्य असल्याबद्दल विहित नमुन्यात बंधपत्र लिहून दिले पाहिजे.
7. अकृषिक परवानगीच्या अनुषंगाने अभिन्यास मंजुर झालेल्या दिनांकापासुन **एक वर्षात** जमीनीचा अकृषिक वापर सुरु न केल्यास अकृषिक परवानगी रद्द होईल.
8. विषयांकीत जागेवर **बांधकाम सुरु करण्यापूर्वी बांधकाम नकाशे सक्षम प्राधिकरणाकडून मंजुर करुन घेणे बंधनकारक आहे.**
9. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी अभिन्यासास शिफारस केल्याप्रमाणे अभिन्यासाच्या जागेवर प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासाचे सभोवतातील मंजुर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्य रितीने समन्वय साधणे आवश्यक आहे. विषयांकीत जमीनीसाठीचा प्रस्तावित पोच रस्ता मोजणी करुन तो मोजणी नकाशा प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सुध्दा दर्शवावा.
10. अभिन्यासाच्या जागेवर प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी अभिन्यासास शिफारस केल्याप्रमाणे अभिन्सातील खुली जागा नियमाप्रमाणे राखुन ठेवणे बंधनकारक राहील.

11. अभिन्यासाच्या जागेवर प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी अभिन्यासास शिफारस केल्याप्रमाणे अभिन्सातील सार्वजनिक उपयोगाची जागा नियमाप्रमाणे राखुन ठेवणे बंधनकारक राहील.

12. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास भुखंड आखतांना ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत. तसेच रस्त्याचे दुतर्फा व बांधकाम परिसरातील मोकळया जागेत जास्तीत जास्त वृक्ष रोपण करुन त्याची देखभाल स्वखर्चाने करावी लागेल.

13. विद्यमान जुने / नविन सर्व प्रकारचे इमारत बांधकाम नागपूर महानगर पालिकेला लागु असलेल्या इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार सामासिक अंतरात येत असल्यास पाडून टाकावे लागेल.

14. विषयांकीत जमीनीतुन जाणाऱ्या विद्युत वाहिनी पासुनचे सामासिक अंतर हे अहवालात इंडियन ईलेक्ट्रीसिटी रुल्स व दुरुस्ती तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अद्यावत नियमानुसार असावे.

15. विषयांकीत जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहिनी किंवा दुरध्वनी वाहीनी जात असेल तर ती रस्त्याचे कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

16. 220 के.व्ही. च्या लाईनच्या दोन्ही बाजुने प्रत्येकी 25.00 मीटर जागा क्लिअरन्स करीता सोडण्यात यावी, म्हणजे एकुण 50.00 मीटर जागा लाईनच्या क्लिअरन्स करीता सोडण्यात यावी. तथापि, जर भविष्यात कोणत्याही प्रकारचे अतिउच्चदाब विद्युत वाहिनी वरिल सदर जमिनीवरुन जात असल्यास, किंवा अस्तित्वात असलेल्या विद्युत वाहिनीच्या मार्गात बदल झाल्यास त्या करिता लागणारा क्लिअरन्स बेल्ट सोडणे बंधनकारक राहील व विद्युत वाहिनीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा अडथळा मान्य करण्यात येणार नाही. तसेच विद्युत वाहिनीच्या संचलन व सुव्यवस्थेच्या कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा मान्य करण्यात येणार नाही.

17. प्रस्तावित बांधकाम हे रेल्वे लाईनच्या हद्दी पासुन 30.00 मीटर अंतराचे आंत नसावे.

18. विषयांकीत जमीनीतुन पाण्याचे स्त्रोत असल्यास संबंधित विभागाचे (पाटबंधारे / जलसिंचन) आवश्यक ते नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल. विषयांकीत जमीनीस पोच असणे आवश्यक राहील.

19. भविष्य काळात भुखंडाचे विभाजन करता येणार नाही.

20. इतर स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

21. प्रस्तावित लेआउट चे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था व सिव्हरलाईनचे काम आवेदकांस स्वखर्चाने करावे लागेल. तसेच उपरोक्त परिसरातील सांडपाणी रस्त्यावर वाहून येणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

22. इमारत रेषा - रस्त्याचे मध्य रेषेपासुन दोन्ही बाजुने अंतर 12.00 मीटर असावे.

23. नियंत्रण रेषा - रस्त्याचे मध्य रेषेपासुन अंतर 25.00 मीटर असावे.

24. रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे क्रॉसिंग (सी.डी.वर्क्स) इत्यादी पुर्व परवानगी शिवाय करण्यात येवू नये.

25. राष्ट्रीय महामार्गापासुन 75.00 मिटरचे आंत कोणतेही बांधकाम करण्यात येवू नये. राष्ट्रीय महामार्गाजवळील जागेत बांधकाम करतांना कार्यकारी अभियंता, रा.म. मार्ग यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

26. रस्त्याचे हद्दीपासून लेआउटवर जाण्या - येण्याकरीता **नियमाप्रमाणे** मीटर रुंदीचा समांतर सेवा रस्ता असावा.

27. अभिन्यास मोजणी फी उपअधिक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे भरण्यात आलेली आहे.

28. अभिन्यास मंजूरी शिवाय जागेचे विभाजन करता येणार नाही.

29. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपाण्याची व्यवस्था या किमान नागरी सुविधांकरीता जमिन मालकाने स्थानिक प्राधिकरण, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे विकास शुल्क खजिना दाखल करणे / त्याबाबतचा करारनामा करणे बंधनकारक राहील.

30. अभिन्यासास **जिल्हाधिकारी, नागपूर** यांचे अंतिम मंजुरी शिवाय खेरदी - विक्रीचे व्यवहार नोंदी रुजु करु नयेत.

31. **कार्यकारी अभियंता** (मेट्रो), **नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचे पत्र **क्रमांक : का. अभि.** (मेट्रो)/स.अ.-1/3748, दिनांक 04/12/2015 अन्वये सर्व्हे क्रमांक – 34/2, आराजी – 0.81 हे.आर., म्हणजेच 8100.00 चौरस मिटर **पैकी कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर** सुधार प्रन्यास, नागपूर यांनी मंजुर केलेले अभिन्यास क्षेत्र आराजी – 0.30 **हे.आर.**, म्हणजेच 3000.00 चौरस मिटर कृषिक जमीनीस **निवासी** वापरास अकृषिक परवानगी प्रदान करण्यात येत आहे.

32. कार्यकारी अभियंता (मेट्रो), **नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचे पत्र **क्रमांक : का. अभि.** (मेट्रो)/स.अ.-1/3748, दिनांक 04/12/2015 अन्वये शिफारस केलेल्या अभिन्यासात बदल झाल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

33. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचेकडून अभिन्यासास अंतिम मंजुरी प्राप्त करुन **जिल्हाधिकारी, नागपूर** यांची सदर्हु अभिन्यासास अंतिम मंजुरी प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

34. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचे पत्र **क्रमांक : का. अभि.** **(मेट्रो)/स.अ.-1/3748,** दिनांक 04/12/2015 मध्ये नमुद केल्यानुसार अकृषिक आदेश पारित झाल्यानंतर विकास परवानगीकरीता **भुमालक व नागपूर सुधार प्रन्यास** यांच्यात भूविकासाकरीता **करारनामा** करणे बंधनकारक राहील.

35. सर्व्हे क्रमांक **34/2,** आराजी – **0.81 हे.आर.,** म्हणजेच 8100.00 चौ.मी. कृषिक जमिनीपैकी **निवासी** प्रयोजनार्थ **अभिन्यासांतर्गत** कार्यकारी अभियंता (मेट्रो), **नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी शिफारस केलेले अकृषिक क्षेत्र आराजी – 0.30 **हे.आर.,** म्हणजेच 3000.00 **चौरस मिटर** असुन अभिन्यासातील **निवासी भुखंडाखालील** क्षेत्र 2592.4409 चौ.मी., **ॲमेनिटी क्षेत्र** 300.293 चौ. मी., असल्यामुळे सदर्हु अभिन्यासातील भुखंडाखालील व

सार्वजनिक वापरा चे एकुण क्षेत्र 2592.4409 चौ.मी. क्षेत्रावर अकृषिक सारा आकारण्यात यावा.

36. सर्व्हे क्रमांक 34/2, च्या अभिन्यासातील वाहनतळाकरीता राखीव जागा, खुली जागा, प्रवेशाकरीता खुली जागा व अंतर्गत रस्त्याची जागा याची नोंद शासन नावें करुन व्यवस्थेकरीता स्थानिकं प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावी.

37. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक / विकासक यांनी स्वखर्चाने करणे आवश्यक राहील.

38. **सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास प्रादेशिक योजनेची प्रमाणित विकास नियंत्रण नियमावली 2013 व दिनांक 20.02.2015 रोजी प्रकाशित नागपूर महानगर क्षेत्र प्रारुप विकास नियंत्रण नियमावली लागू राहील.**

39. **अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (Black & Gray Water) पुर्नवापर करण्यासाठी बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशिंग, फिश पॉंड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी सांडपाणी प्रक्रिया केंन्द्र उभारणे आवश्यक राहील, तसेच त्याची निगा राखण्याची जबाबदारी अभिन्यास धारक / विकासक यांची राहील.**

40. **दिनांक 21/11/2013 रोजी मंजुर प्रादेशिक विकास योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील 24.1 चे तरतुदीनुसार सदर जागेवरील अभिन्यासातील 24 मीटर रुंद रस्त्याखालील जागा विशेष नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तांतरीत करावी लागेल. उक्त प्रक्रियेनंतर सदहु जागा सार्वजनिक रस्त्याचा भाग होईल व मंजुर प्रादेशिक विकास योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील 24.1 चे तरतुदीनुसार F.S.I. अनुज्ञेय होईल.**

41. **अभिन्यासास थेट पोच म्हणून अभिन्यासाच्या जागेलगतच्या मंजुर अभिन्यासातील प्रादेशिक योजनेतील रस्ते जमिन मालक / विकासक यांनी स्व:खर्चाने विकसित करणे बंधनकारक राहील.**

42. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांचे पत्र **क्रमांक : का. अभि. (मेट्रो)/स.अ.-1/3748,** दिनांक 04/12/2015 मधील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

43. सर्व संबंधित विभागांनी नमुद केलेल्या सर्व अटी शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

44. अकृषिक आदेश मिळाल्यानंतर आदेशापासुन एक महिन्याचे आंत कलम 44(6) अन्वये सनद कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. सनद कार्यान्वित न केल्यास हा अकृषिक परवानगीचा आदेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(मौजा – **बेलतरोडी,** प.ह.नं.- 12 अ, तालुका – **नागपूर (ग्रामिण),** सर्व्हे क्रमांक – 34/2, आराजी – 0.81 **हे.आर.,** म्हणजेच 8100.00 चौरस मिटर कृषिक जमीनीपैकी **निवासी** प्रयोजनार्थ **अभिन्यासांतर्गत कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर** यांनी शिफारस केलेले अकृषिक क्षेत्र आराजी – 0.30 **हे.आर.,** म्हणजेच **3000.00 चौ. मि.** क्षेत्रास **निवासी** वापरास अकृषिक परवानगी मिळणेबाबत)

**(मा. जिल्हाधिकारी, नागपूर द्वारा अनुमोदित)**

**स्वा/- सचिन कुर्वे**
**जिल्हाधिकारी, नागपूर**

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

1. अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर
2. उपविभागीय अधिकारी, **नागपूर (ग्रामिण)**
3. **कार्यकारी अभियंता (मेट्रो), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर**
4. तहसिलदार, **नागपूर (ग्रामिण),** उपरोक्त आदेशाची नोंद तालुका नमुना दोन व गांव नमुना दोन मध्ये घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
5. उपअधिक्षक, भुमि अभिलेख **नागपूर (ग्रामिण),** यांना उचित कार्यवाहीस्तव.
6. सहजिल्हा दुय्यम निबंधक, **नागपूर (ग्रामिण),**
7. **श्रीमती सुशिला चंद्रकांत वाघमारे,** राहणार – **401, रॉयल विस्टा अपार्टमेंट, धंतोली, नागपूर,**
8. स्थायी निवड नस्ती.

11/2/2016
**जिल्हाधिकारी, नागपूर करिता**